ISSN - 2279 - 0489
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF-YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

Single Blind Review / Double Blind Review

Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal No. 47100

Volume - XIV | Issue - II | February - July - 2026

Impact Factor 2026 - 8.077 (www.sjifactor.com)

*Is hereby awarding this certificate to*

प्रा. श्रीमती तेजश्री तानाजी सरकाळे

*In recognition of the publication of the paper titled*

भारतीय ज्ञान परंपराः गुप्त कालातील धार्मिक विचार

**Ajanta Prakashan**
ISO 9001:2015 QMS / ISBN / ISSN
Jaisingpura, Near University Gate, Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad),
Maharashtra - 431 004, Mob. No. 9579260877, 9822620877
ajanta2026@gmail.com | www.ajantaprakashan.in

Editor
Dr. Vinay S. Hatole

---

"Dissemination of Education for Knowledge, Science and Culture."
- Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe

NAAC 'B+' Grade

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's
**ARTS & COMMERCE COLLEGE, KADEPUR**
Affiliated to Shivaji University, Kolhapur

Internal Quality Assurance Cell and Research Committee Jointly Organizes

## A One-Day Multidisciplinary Online National Seminar

On

## CONTRIBUTION OF INDIAN KNOWLEDGE SYSTEM FOR SUSTAINABLE INDIA

(शाश्वत भारतासाठी भारतीय ज्ञान प्रणालीचे योगदान)

(MNSCIKSSI - 2026)

### CERTIFICATE

This is to certify that Mr./Mrs./Miss./Dr. प्रा. श्रीमती तेजश्री तानाजी सरकाळे, सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड has participated/presented a paper titled "भारतीय ज्ञान परंपराः गुप्त कालातील धार्मिक विचार" in the One-Day Multidisciplinary Online National Seminar organized by Arts and Commerce College, Kadepur on Wednesday, 18th February 2026.

| Mr. Dipak C. Devkar | Mr. Dilip A. Pawar | Dr. Vijaya P. Pawar | Dr. Lalasaheb G. Jadhav |
|---|---|---|---|
| Coordinator, IQAC | Seminar Coordinator | Seminar Convener | Principal |

NAAC 'B+' Grade

"Dissemination of Education for Knowledge, Science and Culture."
- Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe



Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

**ARTS & COMMERCE COLLEGE, KADEPUR**

Affiliated to Shivaji University, Kolhapur

Internal Quality Assurance Cell and Research Committee Jointly Organizes

## A One-Day Multidisciplinary Online National Seminar

## On

# CONTRIBUTION OF INDIAN KNOWLEDGE SYSTEM FOR SUSTAINABLE INDIA

(शाश्वत भारतासाठी भारतीय ज्ञान प्रणालीचे योगदान)

**(MNSCIKSSI - 2026)**

## CERTIFICATE

This is to certify that

Smt

Tejashri Tanaji Sarkale

has participated in the One-Day Multidisciplinary Online National Seminar organized by **Arts and Commerce College, Kadepur on Wednesday, 18th February 2026**.

| | | | |
|---|---|---|---|
| Mr. Dipak C. Devkar<br>Coordinator, IQAC | Mr. Dilip A. Pawar<br>Seminar Coordinator | Dr. Vijaya P. Pawar<br>Seminar Convener | Dr. Lalasaheb G. Jadhav<br>Principal |

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47026

ISSN 2319 - 359X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

Single Blind Review / Double Blind Review

Volume - XIV | Issue - II
February - July 2026
Marathi Part - II / Hindi Part - I

Impact Factor / Indexing
2026 - 8.246
(www.sjifactor.com)



Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अनु.क्र. | लेख आणि लेखकचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | प्राचीन भारतीय राज्यशास्त्र आणि परराष्ट्र धोरण: कौटिल्य प्रणित 'सप्तांग' आणि 'मंडल' सिद्धांतांचा समकालीन संदर्भात चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. प्रमोद सुकुमार कराडे** | ७३-७७ |
| १५ | भाई गणपतराव देशमुख यांच्या संदर्भात माणदेशी पाणी परिषद चळवळीचे ऐतिहासिक विश्लेषण<br>**प्रियंका पांडुरंग सरगर**<br>**डॉ. दिलीपकुमार दगडू क्षीरसागर** | ७८-८२ |
| १६ | 'वैदिक काळातील शिक्षण पद्धतीचा अभ्यास'<br>**हरिदास गोविंद ढोके** | ८३-८८ |
| १७ | भारतीय ज्ञान परंपरा आणि प्राचीन भारतीय शिक्षण पद्धती<br>**श्री. राजेंद्र पांडुरंग महानवर** | ८९-९४ |
| १८ | आदिवासी कवितांमध्ये प्रतिबिंबित झालेली पर्यावरणीय शाश्वत विकासाची जीवनमूल्ये<br>**प्रा. रघुनाथ चंदर गवळी** | ९५-१०० |
| १९ | ब्रिटीश आक्रमण व शैक्षणीक जीवनावरील परिणाम<br>**डॉ. रमेश महादेवराव भगत** | १०१-१०४ |
| २० | वीरशैव-लिंगायत संत साहित्यातील शाश्वत जीवनमूल्ये<br>**श्री. शिवशरण गुरुपदआप्पा रटकलकर** | १०५-११० |
| २१ | संत तुकारामांच्या अभंगातील शाश्वत जीवन दृष्टी<br>**डॉ. विजया प्रशांत पवार** | १११-११७ |
| २२ | भारतीय ज्ञान प्रणालीचे ऐतिहासिक योगदान<br>**प्रा. श्री. सोनवणे राजेंद्र रामचंद्र** | ११८-१२१ |
| २३ | 'संत तुकारामांच्या अभंगातील शाश्वत जीवनमूल्ये'<br>**प्रा. कविता राहुल हातकणंगलेकर** | १२२-१२५ |
| २४ | महात्मा बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान, व्यवसाय नीतिशास्त्र व व्यावसायिकता : समकालीन अभ्यास<br>**डॉ. संदीप लोखंडे**<br>**प्रा. अभय जावभाये** | १२६-१३० |
| २५ | भारतीय ज्ञान परंपरा: गुप्त काळातील धार्मिक विचार<br>**प्रा. श्रीमती तेजश्री तानाजी सरकाळे** | १३१-१३७ |

VOLUME - XIV, ISSUE - II - FEBRUARY - JULY - 2026
**GENIUS - ISSN - 2279 - 0489 - IMPACT FACTOR - 8.077 (www.sjifactor.com)** **AP - 8**

# २५. भारतीय ज्ञान परंपरा: गुप्त काळातील धार्मिक विचार

**प्रा. श्रीमती तेजश्री तानाजी सरकाळे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड.

**सारांश**

भारतीय इतिहासाच्या कालखंडात गुप्त काळ (इ.स. ३२० ते ५५०) हा केवळ राजकीय स्थिरतेचा काळ नसून तो खऱ्या अर्थाने 'भारतीय ज्ञान परंपरेचा' सुवर्णकाळ मानला जातो. या कालखंडात धर्म, तत्वज्ञान, कला आणि साहित्य या क्षेत्रांत झालेली प्रगती आजही भारतीय संस्कृतीचा पाया मानली जाते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये गुप्त काळातील धार्मिक जीवनाचे आणि विचारांचे चिकित्सक विश्लेषण करण्यात आले आहे. या काळात प्रामुख्याने हिंदू (वैदिक), बौद्ध आणि जैन या तीन प्रमुख विचारधारा कशा प्रकारे विकसित झाल्या आणि त्यांच्यात कोणता परस्पर समन्वय होता, याचा अभ्यास या शोधनिबंधात केला आहे.

गुप्त राजांच्या उदार आणि सहिष्णू धोरणामुळे या काळात धार्मिक कट्टरता दिसून येत नाही, उलट विविध पंथांमध्ये सुसंवाद दिसून येतो. हिंदू धर्मातील भक्ती मार्गाचा उदय, पुराणांची निर्मिती आणि मंदिर स्थापत्यकलेचा विकास ही या काळाची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. त्याचप्रमाणे, बौद्ध धर्मातील नालंदा विद्यापीठासारखी जागतिक कीर्तीची शिक्षणकेंद्रे आणि जैन धर्मातील साहित्याचे संकलन या गोष्टींनी भारतीय ज्ञान परंपरेला समृद्ध केले. हा काळ म्हणजे प्राचीन परंपरांचा वारसा जपत नव्या विचारांना सामावून घेणारा एक महत्त्वाचा संक्रमण काल होता, ज्याने मानवी मूल्यांना आणि सहिष्णुतेला प्राधान्य दिले.

**प्रस्तावना**

भारतीय ज्ञान परंपरा ही केवळ माहितीचा साठा नसून ती मानवी संस्कृतीच्या इतिहासातील सर्वात प्राचीन, सखोल आणि सातत्यपूर्ण विचारसरणींपैकी एक आहे. हजारो वर्षांच्या चिंतनातून, अनुभवातून आणि प्रयोगांतून ही परंपरा विकसित झाली असून, तिने केवळ भारतालाच नव्हे, तर संपूर्ण जगाला वैचारिक दिशा दिली आहे. ऋषीमुनींच्या आश्रमांतून सुरू झालेला हा ज्ञानाचा प्रवाह पुढे तक्षशिला, नालंदा आणि वलभी सारख्या जागतिक विद्यापीठांमध्ये बहरला. आधुनिक युगात जेव्हा जग पर्यावरणाचे रक्षण, मानसिक शांतता आणि शाश्वत जीवनपद्धतीचा शोध घेत आहे, तेव्हा भारतीय परंपरेची प्रासंगिकता अधिकच वाढली आहे.

भारतीय परंपरेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ती जीवनाकडे तुकड्या-तुकड्यांमध्ये न बघता एकसंधपणे पाहते. यामध्ये भौतिक प्रगती आणि आध्यात्मिक उन्नती या दोन्ही गोष्टींना समान महत्त्व दिले गेले आहे. 'धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष' या पुरुषार्थांच्या माध्यमातून मानवी जीवनाचे संतुलित ध्येय निश्चित करण्यात आले आहे. केवळ पैसा कमवणे किंवा उपभोग घेणे हे जीवनाचे उद्दिष्ट नसून, नैतिकतेच्या अधिष्ठानावर राहून प्रगती करणे ही शिकवण या परंपरेने दिली आहे. यामुळे माणसाचा स्वतःशी, समाजाशी आणि निसर्गाशी असलेला संबंध अधिक दृढ होतो.

भारतीय ज्ञान परंपरेमध्ये 'धर्म' हा शब्द केवळ संकुचित उपासना पद्धती किंवा कर्मकांडांपुरता मर्यादित नसून, तो अत्यंत व्यापक आणि सखोल अर्थाने वापरला गेला आहे. भारतीय ज्ञान परंपरेचे धार्मिक महत्त्व समजून घेताना आपल्याला हे लक्षात घ्यावे लागते की, येथे धर्म म्हणजे 'कर्तव्य', 'न्याय' आणि 'धारणा' असा आहे. ही परंपरा माणसाला केवळ ईश्वराशी जोडत नाही, तर त्याला सृष्टीतील प्रत्येक घटकाशी आदरपूर्वक वागण्यास शिकवते.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. प्राचीन काळातील गुप्त काळातील धार्मिक विचार आणि त्यांच्या स्वरूपाचा सखोल अभ्यास करणे.

२. हिंदू, बौद्ध आणि जैन या धर्मांच्या तत्कालीन स्थितीचे आणि त्यांच्या परस्पर संबंधांचे विश्लेषण करणे.

३. गुप्त काळातील धार्मिक सहिष्णुतेचा भारतीय ज्ञान परंपरेवर झालेला परिणाम अभ्यासणे.

४. तत्कालीन साहित्यातील आणि स्थापत्यकलेतील धार्मिक प्रतिबिंबांचे मूल्यमापन करणे.

**गुप्त काळाची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

प्राचीन भारतीय इतिहासात गुप्त काळ (इ.स. ३२० ते ५५०) हा एक अत्यंत गौरवशाली आणि सुवर्णकाळ मानला जातो. या काळाने भारताच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि राजकीय जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणले. गुप्त सम्राट हे प्रामुख्याने वैष्णव धर्माचे अनुयायी होते, परंतु त्यांनी सर्व धर्मांना समान सन्मान आणि राजाश्रय दिला, ज्यामुळे हा काळ धार्मिक सहिष्णुतेचा आदर्श ठरला. गुप्त काळ हा केवळ राजकीय सत्तेचा काळ नव्हता, तर तो भारतीय संस्कृतीच्या समृद्धीचा पाया होता, ज्याचे पडसाद आजही भारतीय संस्कृतीत पाहायला मिळतात.

गुप्त साम्राज्याची स्थापना श्रीगुप्त यांनी केली असली तरी, चंद्रगुप्त प्रथम, समुद्रगुप्त आणि चंद्रगुप्त विक्रमादित्य यांसारख्या पराक्रमी राजांच्या काळात या साम्राज्याचा विस्तार आणि सांस्कृतिक विकास झाला. समुद्रगुप्ताने आपल्या पराक्रमाने भारताचे एकत्रीकरण केले, तर चंद्रगुप्त विक्रमादित्याने कलेला आणि साहित्याला राजाश्रय देऊन नवरत्नांचा दरबार सजवला. या राजकीय स्थैर्यामुळेच धर्माच्या क्षेत्रात नवनवीन प्रयोग करणे आणि ज्ञानाची देवाणघेवाण करणे शक्य झाले.

**हिंदू धर्म: पुनरुज्जीवन आणि स्वरूप**

भारतीय ज्ञान परंपरेत वैदिक धर्माने तत्कालीन काळानुसार स्वतःमध्ये आवश्यक ते बदल घडवून आणले. गुप्त काळात हिंदू धर्माचे स्वरूप हे अधिक लोकशाहीवादी आणि सर्वसमावेशक बनले. वैदिक धर्माने भक्तीमार्गाचा स्वीकार केला, ज्यामध्ये ईश्वराची आराधना करण्यासाठी यज्ञ-यागापेक्षा 'भक्ती' महत्त्वाची मानली गेली.

**भक्तीमार्ग आणि अवतारवाद**

ग्रीक, पल्लव, शक, कुशान या परकीयांना आपल्यात सामावून घेण्यासाठी वैदिक धर्माने अवतार कल्पनेचा अंगीकार केला. वैदिक धर्माची ही नवी सर्वसमावेशक रूप म्हणजे "हिंदू धर्म" होय. गुप्त राजे धार्मिक बाबतीत सहिष्णू होते. प्रत्येकाला धार्मिक स्वातंत्र्य

होते. धार्मिक स्वातंत्र्य हेच गुप्त काळाचे खास वैशिष्ट्य आहे. गुप्त काळात राजाश्रय मिळाल्यामुळे हिंदू धर्माची उन्नती झाली परंतु भक्ती मार्गाचा स्वीकार केल्यामुळे हिंदू धर्माचा जनसामान्यांवर विलक्षण प्रभाव पडला.

अवतारवादाच्या संकल्पनेमुळे समाजातील विविध थरांना ईश्वराशी जोडणे सोपे झाले. विष्णूचे दहा अवतार आणि त्यांच्या कथांनी सामान्यांच्या मनात नीतिमत्तेची पेरणी केली. या काळात भागवत धर्माचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला. समुद्रगुप्त आणि चंद्रगुप्त द्वितीय यांनी स्वतःला 'परमभागवत' ही पदवी लावून घेतली होती, जे त्यांच्या विष्णूवरील श्रद्धेचे प्रतीक होते.

### पुराणांची रचना आणि महत्त्व

वैदिक परंपरा कायम राखून वैदिक धर्म त्यांच्या सर्वव्यापी सर्वसमावेशक नव्या हिंदू धर्माच्या स्वरूपात भारतीय जनतेच्या अत्यंत लोकप्रिय धर्म बनला. गुप्त काळात हिंदू वैष्णव व शैव संप्रदायाचा विशेष विकास झाला. तसेच गुप्तकाळात पुराणांचे संकलन व प्रसार झाला. विष्णुपुराण, वायुपुराण, मत्स्यपुराण, गरुडपुराण आणि वराहपुराण यांमधून सृष्टी निर्मिती, अवतार संकल्पना, राजवंशांचे वर्णन आणि धार्मिक आचारधर्म स्पष्ट करण्यात आले आहे.

पुराणांमुळे हिंदू धर्म सामान्य जनतेपर्यंत पोहोचला. भारतीय संस्कृतीच्या जडणघडणीत पुराणांनी बहुमोल कामगिरी बजावल्यामुळे पुराणांना 'पाचवा वेद' म्हणतात. परकीय आक्रमणांना भारतीय समाजात सामावून घेऊन भारतीय संस्कृती अखंड राखण्याचे महान कार्य पुराणग्रंथांनी केले. पुराणांतील कथांनी केवळ धार्मिकच नव्हे तर सामाजिक आणि नैतिक संस्कारही सामान्य लोकांवर केले.

### मंदिर स्थापत्य आणि मूर्तिकला

गुप्त काळातील धार्मिक जीवनाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे मंदिर स्थापत्य व मूर्तिकला. या काळात दगडी मंदिरे, देवतांच्या मूर्ती आणि धार्मिक शिल्पकलेचा विकास झाला. देवाला मानवी रूपात साकारण्याची परंपरा दृढ झाली. मंदिरे ही केवळ पूजा स्थळे न राहता सांस्कृतिक व सामाजिक केंद्रे बनली. देवगडचे दशावतार मंदिर आणि भीतरगावचे विटांचे मंदिर ही या काळातील स्थापत्यकलेची उत्कृष्ट उदाहरणे आहेत.

मूर्तिकलेच्या बाबतीतही गुप्त काळात मोठी प्रगती झाली. विष्णू, शिव, दुर्गा आणि इतर देवतांच्या मूर्तींमध्ये एक प्रकारची दिव्यता आणि शांतता दिसून येते. सांची आणि उदयगिरी येथील शिल्पे गुप्त काळातील कलाकारांच्या कौशल्याची साक्ष देतात. या काळात मूर्तींना वस्त्रांनी आणि अलंकारांनी सजवण्याची पद्धत रूढ झाली, ज्यामुळे भक्तीचा भाव अधिक प्रकट झाला.

### बौद्ध धर्म: स्थिती आणि आव्हाने

भारतीय इतिहासातील गुप्त काळ हा प्रामुख्याने हिंदू धर्माच्या पुनरुज्जीवनासाठी ओळखला जात असला, तरीही या काळात बौद्ध धर्माचे महत्त्व कमी झाले नाही. गुप्त सम्राट जरी हिंदू धर्माचे असले, तरी त्यांनी बौद्ध धर्माला कोणताही त्रास दिला नाही. समाजातील सर्व धर्मीयांना पंथांना उदार राजाश्रय दिला, त्यामुळे गुप्त काळ हा बौद्ध धर्माच्या संस्थात्मक व बौद्धिक उत्कर्षाचा कालखंड मानला जातो.

**महायान पंथाचा विस्तार**

गुप्त काळात बौद्ध धर्माचा महायान पंथ विशेष प्रभावी होता. हिनयान पंथाचा प्रभाव कमी होत गेला. महायान पंथात बुद्धाला देवतास्वरूप प्राप्त झाले. बुद्धाची पूजा, मूर्ती व स्तूप यांना महत्त्व वाढले. करुणा, मैत्री आणि बोधिसत्त्व संकल्पना या काळात अधिक विकसित झाल्या. गुप्त काळात बौद्ध संघ अस्तित्वात होता; मात्र संघातील शिस्त पूर्वीइतकी कडक राहिली नाही, असे काही विद्वानांचे मत आहे.

मठामध्ये शिक्षण, वादविवाद व ग्रंथलेखन चालू होते. हिंदू धर्माच्या वाढत्या प्रभावामुळे बौद्ध संघाला सामाजिक व आर्थिक स्पर्धेला सामोरे जावे लागले. बौद्ध तत्वज्ञानाने या काळात तर्कशास्त्र आणि ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या. दिनाग आणि वसुबंधू यांसारख्या बौद्ध विद्वानांनी या काळात आपले महान ग्रंथ लिहिले.

**नालंदा विद्यापीठ: ज्ञानाचे वैश्विक केंद्र**

गुप्त काळातील बौद्ध धर्माचा सर्वात महत्त्वाचा आधार म्हणजे नालंदा विद्यापीठ होय. हे विद्यापीठ आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शिक्षणकेंद्र होते. येथे बौद्ध तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, व्याकरण, वैद्यक, गणित इत्यादी विषय शिकवले जात. भारताबरोबरच चीन, तिबेट, कोरिया आणि आग्नेय आशियातून विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येत असत. कुमारगुप्त प्रथम याने या विद्यापीठाला मोठ्या प्रमाणावर दाने दिली होती.

नालंदा हे केवळ शिक्षणाचे केंद्र नव्हते, तर ते बौद्ध धर्माच्या बौद्धिक श्रेष्ठतेचे प्रतीक होते. येथे हजारो विद्यार्थी आणि शेकडो आचार्य राहत असत. या विद्यापीठामुळे बौद्ध धर्माने आपली बौद्धिक ओळख टिकवून ठेवली. गुप्त काळातील बौद्ध मूर्ती विशेषतः सारनाथ शैलीतील बुद्धमूर्ती अत्यंत प्रसिद्ध आहेत. या मूर्तींमध्ये शांतता, करुणा आणि आध्यात्मिक भाव स्पष्टपणे दिसतो. बुद्धाला मानवी आणि देवतासदृश रूपात साकारण्यात आले. ही कला पुढील आशियाई बौद्ध कलेवर प्रभाव टाकणारी ठरली.

गुप्त काळातील बौद्ध धर्माची स्थिती ही ऱ्हास व अस्तित्व यांचा संगम दर्शविते. राजाश्रय कमी झाला असला तरी बौद्ध धर्म पूर्णतः नष्ट झाला नाही. महायान पंथाचा विकास, नालंदासारखी शिक्षणकेंद्रे, बौद्ध कला व तत्वज्ञान यामुळे बौद्ध धर्माने आपली बौद्धिक व सांस्कृतिक ओळख टिकवून ठेवली. गुप्त काळातील धार्मिक सहिष्णुतेमुळेच हे शक्य झाले. त्यामुळे गुप्त काळातील बौद्ध धर्म भारतीय धार्मिक इतिहासातील एक महत्त्वाचा संक्रमण काल मानला जातो.

**जैन धर्म: प्रगती आणि सामाजिक आधार**

गुप्त काळ हा भारतीय इतिहासातील 'सुवर्णकाळ' मानला जातो. या काळात जरी गुप्त राजे प्रामुख्याने वैष्णव पंथाचे अनुयायी होते, तरीही त्यांनी इतर धर्मांप्रती अत्यंत उदार आणि सहिष्णु धोरण स्वीकारले होते. त्यामुळे या काळात जैन धर्माची स्थिती समाधानकारक आणि प्रगत होती.

**सामाजिक आधार आणि संप्रदाय**

गुप्त काळात जैन धर्माचा मुख्य सामाजिक आधार व्यापारी व शहरी वर्ग होता. अहिंसा, सत्य, अपरिग्रह आणि नैतिक आचारसंहिता या तत्त्वांमुळे व्यापारासाठी जैन धर्म उपयुक्त मानला गेला. त्यामुळे अनेक व्यापारी, सावकार व नगरश्रेष्ठी जैन धर्माचे अनुयायी झाले. त्यांनी जैन संघ, मठ व मंदिरांना आर्थिक साहाय्य केले. गुप्त काळात जैन धर्मातील श्वेतांबर व दिगंबर या दोन प्रमुख पंथांचे अस्तित्व स्पष्टपणे दिसते. या दोन्ही पंथांमध्ये आचार, वस्त्रधारणेच्या पद्धती व धार्मिक विधींमध्ये फरक होता. तथापि दोन्ही पंथ शांततेने सहअस्तित्व राखून होते. उत्तर भारतात श्वेतांबर परंपरा तर मध्य व दक्षिण भारतात दिगंबर परंपरा अधिक प्रभावी होती.

जैन संघ हा भिक्षू, साध्वी, श्रावक व श्राविका यांवर आधारित होता. गुप्त काळात जैन संघ संघटित स्वरूपात कार्यरत होता. उपासना, व्रत, उपवास, दानधर्म आणि धार्मिक प्रवचनांद्वारे जैन धर्माचा प्रचार केला जात असे. तथापि बौद्ध संघाप्रमाणे जैन संघालाही काही प्रमाणात सामाजिक व आर्थिक स्पर्धेला सामोरे जावे लागले.

**साहित्याचे संकलन आणि तत्वज्ञान**

गुप्त काळात जैन साहित्यनिर्मिती सुरू होती. आगम साहित्याचे संकलन, भाष्ये आणि नैतिक ग्रंथ यांचा प्रसार झाला. अहिंसा, अनेकांतवाद आणि स्याद्वाद या जैन तत्वज्ञानाची मांडणी अधिक स्पष्ट झाली. या तत्त्वांनी भारतीय तत्वज्ञानावर मोठा प्रभाव टाकला. या काळात वलभी येथे झालेल्या जैन परिषदेत (इ.स. ४५३) जैन आगम ग्रंथांना अंतिम स्वरूप देण्यात आले, ही जैन धर्माच्या इतिहासातील एक महत्त्वाची घटना मानली जाते.

गुप्त काळात जैन धर्माचा प्रसार मर्यादित राहण्यामागे काही कारणे होती. कठोर तपश्चर्या, संन्यासप्रधान जीवनपद्धती आणि सामान्य जनतेसाठी अवघड वाटणारे आचारनियम यामुळे जैन धर्माचा व्यापक लोकप्रसार झाला नाही. हिंदू भक्ती परंपरेच्या लोकप्रियतेसमोर जैन धर्म तुलनेने मर्यादित राहिला. तथापि, जैन धर्माने आपले स्वतंत्र अस्तित्व आणि नैतिक अधिष्ठान टिकवून ठेवले. गुप्त काळातील जैन धर्माची स्थिती ही टिकाव व मर्यादा यांचा संगम दर्शविते. राजाश्रय कमी असला तरी व्यापारी वर्गाचा आधार, संघटनात्मक रचना, साहित्यनिर्मिती व स्थापत्यकलेमुळे जैन धर्माने आपले अस्तित्व कायम राखले. धार्मिक सहिष्णुतेच्या वातावरणामुळे जैन धर्म शांततेने नांदत राहिला. उदयगिरी आणि मथुरेतील जैन शिल्पे गुप्त काळातील जैन कलेचे उत्कृष्ट दर्शन घडवतात.

**धार्मिक सहिष्णुता आणि सामाजिक समन्वय**

गुप्त काळातील सर्वात मोठे यश म्हणजे विविध धर्मांमधील परस्पर सहकार्य आणि समन्वय होय. एकाच कुटुंबात विविध धर्मांचे अनुयायी असू शकत होते. उदाहरणार्थ, काही राजे विष्णूचे भक्त होते, तर त्यांचे काही अधिकारी किंवा सेनापती बौद्ध किंवा जैन असू शकत होते. यालाच खऱ्या अर्थाने भारतीय ज्ञान परंपरेतील 'सर्वधर्मसमभाव' म्हणता येईल.

**धार्मिक सहिष्णुतेची काही महत्त्वाची उदाहरणे**

- समुद्रगुप्ताने लंकेच्या राजाला बोधगया येथे बौद्ध विहार बांधण्याची परवानगी दिली होती.
- चंद्रगुप्त विक्रमादित्याचा सेनापती आम्रकार्दव हा बौद्ध होता.
- अनेक जैन मंदिरांना हिंदू राजांनी दाने दिली होती.

या समन्वयामुळेच भारतीय संस्कृती अधिक प्रगल्भ झाली. हिंदू धर्माने बुद्धाला विष्णूचा अवतार मानून आपल्यात सामावून घेतले, तर बौद्ध आणि जैन धर्मांनी हिंदू धर्मातील अनेक सांस्कृतिक बाबींचा स्वीकार केला. हा कालखंड भारतीय मनाच्या विशालतेचा आणि वैचारिक प्रगल्भतेचा परिपाक होता.

| धर्म | मुख्य आधार | प्रमुख योगदान |
|---|---|---|
| हिंदू (वैदिक) | भक्तिमार्ग, पुराण साहित्य | मंदिर स्थापत्य, अवतारवाद, संस्कृत साहित्य |
| बौद्ध | नालंदा विद्यापीठ, महायान पंथ | तर्कशास्त्र, जागतिक शिक्षण, मूर्तिकला |
| जैन | व्यापारी वर्ग, आगम साहित्य | अहिंसा, अनेकांतवाद, नैतिक आचारसंहिता |

**निष्कर्ष**

भारतीय ज्ञान परंपरेचा इतिहास प्राचीन काळापासून वेद, उपनिषदे, श्रमण परंपरा व तत्त्वचिंतनाच्या समृद्ध वारशाने घडलेला आहे. या परंपरेच्या विकासात गुप्त काळ हा महत्त्वाचा टप्पा ठरतो. या काळात हिंदू, बौद्ध व जैन धर्मांनी परस्पर सहअस्तित्व व समन्वयाच्या माध्यमातून भारतीय धार्मिक विचार समृद्ध केले. भक्ती, करुणा, अहिंसा व नैतिकता या समान मूल्यांमुळे गुप्त काळातील धार्मिक विचार मानवकेंद्री व सहिष्णू बनले.गुप्त काळातील हा धार्मिक प्रवास केवळ श्रद्धांपुरता मर्यादित नव्हता, तर तो ज्ञान आणि विज्ञानाच्या प्रगतीशीही जोडलेला होता. आर्यभट्ट आणि वराहमिहिर यांसारख्या शास्त्रज्ञांनी याच काळात आपली कामगिरी बजावली. याचा अर्थ असा की, धर्म हा प्रगतीच्या आड येणारा नसून तो समाजाला आधार देणारा आणि विचार करायला लावणारा घटक होता.आजच्या काळात जेव्हा जगात धार्मिक कट्टरता आणि संघर्ष वाढत आहेत, तेव्हा गुप्त काळातील धार्मिक सहिष्णुतेचा आदर्श आपल्याला नवी दिशा देऊ शकतो. विविध विचारधारांना सोबत घेऊन समाजाची प्रगती कशी साधता येते, याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. भारतीय ज्ञान परंपरेने दिलेला हा समन्वयाचा आणि मानवतेचा वारसा जपणे हीच काळाची गरज आहे. गुप्त काळाने दिलेली ही वैचारिक समृद्धी आजही भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग असून ती आपल्याला आपल्या गौरवशाली इतिहासाची सतत आठवण करून देत राहील.

**संदर्भ**

१. मजुमदार, आर. सी. (१९७७). द क्लासिकल एज (The Classical Age). भारतीय विद्या भवन, मुंबई.

२. अल्तेकर, अ. स. (२०१४). प्राचीन भारताचा इतिहास आणि संस्कृती. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

३. झा, डी. एन. (२००४). एन्शियंट इंडिया: इन हिस्टोरिकल आऊटलाईन. मनोहर पब्लिकेशन्स.

४. कोसंबी, डी. डी. (२००२). प्राचीन भारतीय संस्कृती आणि सभ्यता. लोकवाङ्मय गृह.

५. राधाकृष्णन, एस. (१९९९). इंडियन फिलॉसॉफी (खंड १ व २). ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.

६. सांकृत्यायन, राहुल. (२००९). दर्शन-दिग्दर्शन. किताब महल. (बौद्ध व जैन दर्शनासाठी).

७. अग्रवाल, व्ही. एस. (१९७७). गुप्त आर्ट (Gupta Art). पृथ्वी प्रकाशन, वाराणसी.

८. धोरे, विठ्ठल. भारतीय मंदिर स्थापत्य आणि मूर्तिकला.